# 'औरंगाबाद चॅप्टर'तर्फे गुणवंतांचा सत्कार



दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स ऑफ इंडियाच्या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. या वेळी एस. बी. बडवे, राघवेंद्र जोशी, राजेश शुक्ला, ए. आर. जोशी.

औरंगाबाद, ता. १३ : दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स ऑफ इंडियाच्या जून २००४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा 'औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंट्स'च्या शाखेतर्फे नुकताच सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून बडवे इंजिनिअरिंगचे एस. पी. बडवे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी आर. जे. ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष राघवेंद्र जोशी होते.

औरंगाबाद चॅप्टरमधून या वर्षी १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. चॅप्टरचे अध्यक्ष एस. बी. खडके यांनी शाखेतर्फे विद्यार्थी तसेच औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम तसेच अभ्यासक्रमांची माहिती दिली. एस. पी. बडवे तसेच राघवेंद्र जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. एस. के. वाया यांनी आभार मानले. या प्रसंगी संस्थेचे सचिव राजेश शुक्ला, ए. आर. जोशी, एम. आर. पंडित, आर. जी. मोदानी, एस के. जैन, आर. पी. गोरे, समीर खेकाळे, डी. व्ही. डबरी, एन. आर. शर्मा, ए. बी. देशपांडे, एस. आर. भोईटे, रोहित रोंघे आणि विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# अपयशात यशाचे रहस्य दडलेले -जोशी

औरंगाबाद, दि.१३ (लोकमत ब्युरो)- जीवनाच्या प्रारंभी येणाऱ्या अपयशातच यशाचे रहस्य दडलेले असते. त्यामुळे अपयशामुळे निरुत्साही न होता अधिक झटून आणि निश्चयपूर्वक काम केले पाहिजे. जे असे करतात त्यांना निश्चित यश मिळते, असे उद्गार आर.जे. उद्योग समूहाचे अध्यक्ष राघवेंद्र जोशी यांनी काढले.

आय.सी.डब्ल्यू.ए.आय.च्या फाऊंडेशन, इंटर-१, इंटर-२ आणि अंतिम परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्थानिक शाखेतर्फे सत्कार करण्यात आला, त्यावेळी आयोजित कार्यक्रमात जोशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक शाखेचे अध्यक्ष एस.बी. खडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ उद्योगपती शंकरराव बडवे उपस्थित होते. प्रारंभी, राजेश शुक्ला यांनी प्रास्ताविक केले. ए.आर. जोशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्योगपती राघवेंद्र जोशी पुढे म्हणाले की, प्रत्येकाला आयुष्यात एकदा तरी अपयशाचे कडू घोट पचवावेच लागतात. मीदेखील विद्यार्थीदशेत तीनवेळा अनुत्तीर्ण होण्याचे दुःख पचवलेले आहे. मात्र, या अपयशातच यशाचे निखारे दडलेले होते. त्या जोरावरच आता हे यश आपण मिळविलेले आहे. प्रमुख अतिथी ज्येष्ठ उद्योगपती शंकरराव बडवे म्हणाले की, अपयशातून विद्यार्थ्यांनी खूप काही शिकायला हवे. जर एखादा विद्यार्थी पहिल्या प्रयत्नात अपयशी झाला तर त्याने स्वतःला कमी समजता कामा नये. उलट अधिक जोमाने व अचूकपणे,प्रयत्न केले पाहिजेत. प्रारंभी, खडके यांनी शाखेच्या कामाची माहिती दिली. ए.आर. जोशी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राघवेंद्र जोशी आणि शंकरराव बडवे यांच्या हस्ते मयुरी कुलकर्णी, अमृता भल्ला, अश्विनी भाकरे, सुनील कुलकर्णी, मनोज मालपाणी, प्रवीण पटेल, समीर यांबळ, शिल्पा विद्वांस, नीता रोचवाणी, अनिता अमृते, अभिजित देशमुख, स्वप्नील साहुजी, सचिन चौधरी, एस.के. चिमणगुंडे, अमजद खान, अस्मिता पालकर, मनीषा लुल्ला, नीलेश व्यवहारे आणि स्वप्नील डहाके यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन राजेश शुक्ला यांनी केले. सुनील वाया यांनी आभार मानले. यावेळी रामानंद मोदानी, गोरे, समीर खेकाळे, ज्ञानेश डबीर, स.भु. महाविद्यालयाचे प्रा. देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



औरंगाबादेत आय.सी.डब्ल्यू.ए.आय.च्या यशस्वी विद्यार्थ्यांचा उद्योगपती शंकरराव बडवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. छायाचित्रात उद्योगपती राघवेंद्र जोशी, एस.बी. खडके आणि ए.आर. जोशी दिसत आहेत.